# वाघ कॉलेजमध्ये वारली कार्यशाळा

**नाशिक :** के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग एज्युकेशन अॅण्ड रिसर्च संस्थेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात येत आहे. यानिमित्ताने प्रथमवर्ष बीटेक विद्यार्थ्यांसाठी वारली चित्रशैली परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. आज (दि. १३) व उद्या (दि. १४) सकाळी ११ ते दुपारी ४ पर्यंत ही कार्यशाळा होईल. त्यात जगप्रसिद्ध वारली कलेचा इतिहास, पर्यावरण पूरक व निसर्गस्नेही वारली चित्रकलेची वैशिष्ट्ये, रेखांकन याविषयी माहिती दिली जाणार आहे.

**Maharshtra Times 13-09-2024**